**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-३७४०/२०२३**

**अपिलार्थी, श्री.राहूल कारभारी पिंगळे,**
**रा. ३०३, माँ भवानी अपार्टमेंट, ३रा मजला,**
**भास्कर कॉलनी, सर्व्हिस रोड, नौपाडा, ठाणे प. ४००६०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : १४.१०.२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| **३.२.२०२३** | **२३.३.२०२३** | **३.७.२०२३** | **४.८.२०२३** |

अपिलार्थी यांनी दि.२३.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १४.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(दि.१३.०८.२०२१ रोजी आवक क्र.१९१० अन्वये मा.सहायक आयुक्त कळवा प्रभाग समिती यांनी या कार्यालयास सादर केलेला अनधिकृत बांधकाम संदर्भातल्या अहवालाची नस्तीची छायांकित प्रत मिळणेबाबत.)"*

*"(उपरोक्त विषयांकित नस्ती आपल्या कार्यालयात सादर झाल्यानंतर या अहवालावरती मा. उपायुक्त अतिक्रमण तसेच मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल तसेच त्यांच्या स्वाक्षरी असलेल्या नस्तीची छायांकित प्रत प्राप्त व्हावी.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.४.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, *"अपिलार्थी यांना अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाकडील अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (सनियंत्रण व समन्वय) अतिक्रमण विभाग यांनी सदरची नस्तीबाबत आवक-जावक व इतर नोंदीवरून शोध घेण्यात यावा व शोधणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. नस्तीबाबत अपिलकर्ता यांना माहिती देण्यात यावी."* असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.३.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले आहे की, *"सदर विषयाबाबतची नस्ती या कार्यालयाकडे आवक झाल्याची नोंद आहे. आवक क्र. १९१० दि.१३.८.२०२१. परंतु, सदरची नस्ती दप्तरी उपलब्ध होत नाही. उपलब्ध होताच आपणास कळविणेत येईल."*

याविरूध्द करण्यात आलेल्या प्रथम अपिलामध्ये तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी वरीलप्रमाणे आदेश पारित केले.

प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांना श्री. शंकर पाटोळे, उपआयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी दि.२२.८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविले आहे की, *"आपण विचारलेली माहिती इकडील कार्यालयाच्या अभिलेखावर शोध घेण्याचा तपास अद्यापी चालू आहे. माहिती उपलब्ध झाल्यानंतर त्वरीत आपणास देण्यात येईल कृपया सहकार्य करावे ही विनंती."*

श्री. शंकर पाटोळे, उपआयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या या पत्रानंतरसुध्दा अपिलार्थी यांना अद्याप माहिती प्राप्त झाली नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात आयोगास अशी विनंती केली की, यासाठी आपणास १५ दिवसांचा वेळ देण्यात यावा. या कालावधीत अपिलार्थी यांना आपण माहितीचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करून देऊ. तथापि, २ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्यानंतरही माहितीचा शोध लागत नसल्याने आपण या संदर्भात कोणावर जबाबदारी निश्चित केली आहे का? अशी जन माहिती अधिकारी यांना सुनावणी दरम्यान विचारणा केली असता या संदर्भात त्यांनी असे निवेदन केले की, अद्यापपर्यंत अशी जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे शोध घेतला म्हणजेच नेमके काय केले हेदेखील ते सुनावणी दरम्यान आयोगास सांगू शकले नाहीत.

कार्यालयामध्ये एखादे टपाल प्राप्त झाल्यानंतर त्यानंतर त्याच्या संदर्भात नोंदी ठेवण्यात येऊन ते टपाल कोणाकडे पाठविण्यात आले व शेवटी त्याची नोंद कोणत्या अधिकारी/कर्मचा-याकडे आहे या पध्दतीची संपूर्ण कार्यपध्दती अस्तित्वात आहे. असे असताना कळवा प्रभागातर्फे पाठविण्यात आलेला हा प्रस्ताव ज्याची नोंद ठाणे महानगरपालिकेच्या आवक नोंदवहीमध्ये घेण्यात आली आहे तो नेमका कोणाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे याचा शोध लागत नाही. ही बाब समजून घेणे अशक्य आहे.

अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाच्या प्रशासनाने अशा महत्वाच्या विषयावर पत्रव्यवहाराचा शोध लागत नसल्याने जेवढे गांभीर्य दाखविणे आवश्यक होते तेवढे गांभीर्य दाखविले नाही हे येथे स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे. संवेदनशील प्रकरणाच्या नस्ती गहाळ होण्यासाठी कोण अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत हे निश्चित करून त्यांच्यविरूध्द कारवाई करणे आवश्यक आहे. तथापि, त्या दृष्टिने कोणतेही पाऊल ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाने उचलले आहे असे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिकदृष्टया महत्वाची होती व त्यामुळे ती वेळेत उपलब्ध करून देणे ही सार्वजनिक प्राधिकरण म्हणून ठाणे महानगरपालिकेची जबाबदारी होती. एखादे टपाल गहाळ झाले यासाठी एखादा अधिकारी/ कर्मचारी जबाबदार असणे आवश्यक आहे. अशा प्रसंगी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. या प्रकरणी ठाणे महानगरपालिका, ठाणे या सार्वजनिक प्राधिकरणाने आपले हे कर्तव्य योग्यरित्या पार पाडले नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. तरीही, जन माहिती अधिकारी यांच्या विनंतीप्रमाणे त्यांना माहितीच्या शोधासाठी पुढील १५ दिवसांची मुदत देणे उचित होईल. त्यांनी पुढील १५ दिवसांत या माहितीचा शोध घेऊन अपिलार्थींना माहिती विनामूल्य पुरविणे उचित होईल. पुढील १५ दिवसांच्या कालावधीमध्ये सदर माहितीचा शोध न लागल्यास माहिती गहाळ होण्यासाठी कोण जबाबदार आहे यासाठी संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून तसा लेखी अहवाल पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. या लेखी अहवालाच्या आधारे माहिती न देण्यासाठी कोण जबाबदार आहे हे निश्चित झाल्यानंतर आयोग त्या संदर्भात पुढील आदेश पारित करेल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या विनंतीप्रमाणे त्यांना माहितीच्या शोधासाठी पुढील १५ दिवसांची मुदत देण्यात येत आहे. त्यांनी पुढील १५ दिवसांत या माहितीचा शोध घेऊन अपिलार्थींना माहिती जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. पुढील १५ दिवसांच्या कालावधीमध्ये सदर माहितीचा शोध न लागल्यास माहिती गहाळ होण्यासाठी कोण जबाबदार आहे यासाठी संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून तसा लेखी अहवाल आयोगाकडे विद्यमान जन माहिती**

**अधिकारी श्री. दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी दि.१३.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावा. या लेखी अहवालाच्या आधारे माहिती न देण्यासाठी कोण जबाबदार आहे हे निश्चित झाल्यानंतर आयोग त्या संदर्भात पुढील आदेश पारित करेल.**

**२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-३७४०/२०२३**

**अपिलार्थी, श्री.राहूल कारभारी पिंगळे,**

**सुनावणी दिनांक १३.११.२०२५ (In continuation of order dt.१४.१०.२०२५)**

**<u>विवेचन</u>**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी त्यांचा लेखी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्जदार यांनी मागणी केलेल्या प्रकरणाची नस्तीचा कार्यालयीन दप्तरी शोध घेतला असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सदर प्रकरणाची नस्ती कळवा प्रभाग समिती कार्यालयाकडून अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभगाकडे (मुख्यालय) आवक क्र. १९१० दि. १३.८.२०२१ रोजी वर्ग करण्यात आली.

२. सदरची नस्ती त्याच दिवशी कार्यलयीन टपालाद्वारे तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आली.

३. तदनंतर सदरची नस्ती पुढील आदेशार्थ तत्कालीन अतिरिक्त आयुक्त (२) (श्री. संजय हेरवाडे) यांजकडे सादर करणेकरीता कार्यालयीन अंतर्गत जावक नोंदवहीमध्ये दि.२५.८.२०२१ रोजी नोंद करण्यात आली. तथापि, सदरची नस्ती तत्कालीन उपायक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांनी तोंडी आदेशान्वये सदरची नस्ती स्वत:कडे ठेवून घेतली. त्यामुळे अतिरिक्त आयुक्त (२) (श्री. संजय हेरवाडे) यांचे कार्यालयाकडे नस्ती वर्ग झाल्याची स्वाक्षरी दिसून येत नाही.

४. तदनंतर तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांची शासन आदेश क्र. एमसीओ-२०२१/प्र.क्र. १६०/नवि-१४ दि.३.१.२०२२ अन्वये दि.२७.१.२०२२ रोजी प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने गट-अ नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई या पदावर पदस्थापना करण्यात आली.

५. कार्यालयीन कामाकाजाचे नियमावलीनुसार, सदरची नस्ती कार्यवाहीसाठी अथवा कार्यवाही पूर्ण झाल्यनंतर अथवा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अथवा नस्तीची आवश्यकता नसल्यास सदरची नस्ती पुनश्चः अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभगाकडील टपालामध्ये नोंद घेऊन मूळ विभागाकडे वर्ग करणे अपेक्षित आहे. तथापि, सदर नस्ती तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांचे स्तरावरून पुढे कोणत्या विभागाकडे वर्ग केली. याची नोंद कार्यालयीन दप्तरी आढळून येत नाही. याच कारणास्तव सदरची नस्ती या कार्यालयाकडे आढळून येत नाही व नस्तीवर पुढे काय कार्यवाही झाली याचा बोध होत नाही. तथापि, अपिलार्थी यांना सदर नस्तीबाबतची माहिती देण्यास विलंब होत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

६. सदर प्रकरणी कोण्णत्या अधिकारी/कर्मचारी यांची जबबादारी निश्चित करण्यात यावी हा बाब वरिष्ठ स्तरावरील चौकशी अंती निश्चित होऊ शकेल.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या उपरोक्त लेखी अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची नस्ती ही तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांच्या ताब्यात आहे. तथापि, तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांची या प्रकरणी साक्ष घेणे महत्वाचे आहे. त्या सध्या गट-अ नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई येथे कार्यरत असल्याचे दिसून येते. सबब, तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांचे नावे समन्स काढून त्यांना आयोगाकडे पुढील सुनावणीकरीता स्वत: उपस्थित राहणेबाबत कळविणे उचित होईल.

सदर नस्तीसाठी जबाबदार असणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही करण्यात येणार आहे यासाठी तत्कालीन उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (श्रीमती. अश्विनी वाघमळे) यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीसाठी स्वत: उपस्थित राहणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.६.१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी वाघमळे, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२
**(सध्या कार्यरत सहाय्यक आयुक्त, गट-अ, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई)**
**-यांना प्रत** विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर-३७४०/२०२३**

**अपिलार्थी, श्री.राहूल कारभारी पिंगळे,**

**सुनावणी दिनांक ६.१.२०२६** (In continuation of order dt.१३.११.२०२५)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी कृष्णदेव वाघमळे, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे या उपस्थित आहेत.

या प्रकरणी तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी कृष्णदेव वाघमळे, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या कार्यकाळात कामकाज झालेल्या काही नस्तींच्या छायांकित प्रती अथवा SCAN प्रती त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. केवळ ७ महिने कार्यभार काळ असूनही ठाणे मनपा अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग हा संवेदनशील विभाग असल्याने विविध चौकशी नस्त्यामधील आवश्यक कागदपत्रे, महत्वाचे कामकाज आदेश याच्या छायांकित प्रती अथवा SCAN प्रती त्यांच्याकडे त्यांनी जतन करून ठेवल्या होत्या. यामध्ये उपरोक्त उल्लेखित नस्तीची उपलब्ध असलेली SCAN /छायांकित प्रत त्यांनी सुनावणी दरम्यान आयोगास सादर केली.

सदर छायांकित प्रत तपासली असता सदर नस्ती त्यांच्या स्वाक्षरी व शेरा नमूद केल्यानंतर अतिरिक्त आयुक्त कार्यालय, आवक क्र. १४/०१ दि.१.९.२०२१ नुसार नोंदविल्याचे दिसून येते. तद्नंतर तत्कालीन आयुक्त यांनी दि.१.९.२०२१ रोजी टिप्पणी व आदेश नोंदविल्याचे दिसून येते. याच दरम्यान दि.३०.८.२०२१ रोजी श्रीम. कल्पिता पिंपळे, तत्कालीन सहायक आयुक्त माजिवाडा प्रभाग समिती यांचेवर फेरीवाल्याकडून जीवघेणा हल्ला झाला होता. यामध्ये श्रीम. कल्पिता पिंपळे यांना हाताची दोन

बोटे व त्यांचे सुरक्षारक्षक यांनासुध्दा हाताचे एक बोट गमवावे लागले होते. ही घटना अत्यंत संवेदनशील असल्याने त्यांनी स्वत: उपायुक्त म्हणून ब-याच वेळा श्रीम. कल्पिता पिंपळे, व सुरक्षारक्षक भरती असलेल्या ठिकाणी जुपिटर हॉस्पिटल, ठाणे येथे उपस्थित राहत असल्याचे त्यांच्या स्मरणात आहे. दि. १.९.२०२१ रोजी पहाटेपर्यंत व नंतर दिवसभर त्या स्वत: हॉस्पिटलमध्ये उपस्थित होत्या.

वरील दि.३०.८.२०२१ रोजीच्या हल्ल्यामध्ये जखमी श्रीम. कल्पिता पिंपळे व सुरक्षारक्षक हे पुढील १५-२० दिवस जुपिटर हॉस्पिटलमध्ये भरती होते. तत्कालीन परिस्थितीत अनेक वरिष्ठ नेते, अधिकारी हॉस्पिटलमध्ये भेअ देत आहे. यामध्ये ठाणे प्रशसनामार्फत सुध्दा हॉस्पिटलमध्ये उपस्थिती आवश्यक होती आणि तत्कालीन परिस्थिती अत्यंत तणावाची होती.

यानंतर त्याच आठवडयात अनधिकृत फेरीवाला कारवाईसुध्दा ब-याच प्रभागात सुरू करण्यात आल्या होत्या. या कारवाई दरम्यान त्या अनेक प्रभागांमध्ये उपस्थित असल्याचे त्यांच्या स्मरणात आहे असेही त्यांनी त्यांच्या लेखी खुलाशात नमूद केले आहे.

आपल्या लेखी म्हणण्यामध्ये तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी कृष्णदेव वाघमळे, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी पुढे असेही म्हटले आहे की, दि.६.९.२०२१ रोजी आयोजित महासभेमध्ये वरील घटनेचे पडसाद उमटले होते. याच महासभेत कोविड काळातील अनधिकृत बांधकम संदर्भात संबंधित जबाबदार अधिकारी यांची चौकशी करण्याबाबत ठराव पारित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने उपायुक्त म्हणून आवश्यक कामकाज करण्यासाठी पुढील काळात प्राधान्य दिले असल्याची शक्यता आहे. याशिवाय गणपती उत्सव काळ त्यादरम्यान असल्याने त्यासंदर्भात सुध्दा आवश्यक कामकाज, आढावा, प्रत्यक्ष पाहणी इ. बाबी त्या दरम्यान चालू होत्या. सबब, वरील महासभा कामकाज, गणपती उत्सव आणि दि.३.८.२०२१ रोजीची घटना व त्या अनुषंगाने आवश्यक कामकाज व घटनेचा प्रभाव बराच काळ असल्याने मी सदर नस्ती दि.१.९.२०२१ नंतरच्या आठवडयांत बधितली असल्याची शक्यता आहे. तद्नंतर अंतिम कार्यवाहीसाठी पत्र काढून व आवश्यक सूचना देण्यात येऊन यामध्ये इतर नस्तीप्रमाणे नेहमीच्या सवयीने सदर नस्ती SCAN /छायांकित प्रती त्या घेऊन संबंधित नस्ती तत्कालीन संबधित अधिक्षक/सहायक आयुक्त यांना दिली असेल. उपायुक्त म्हणून प्रत्येक नस्तीबाबत मागोवा अथवा जतन करून ठेवणे शक्य नव्हते. त्याच दरम्यान संबंधित सहायक आयुक्त श्रीम. प्रणाली घोंगे यांची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका येथे बदलीसुध्दा झाली असल्याचे त्यांच्या स्मरणात आहे. दि.३०.८.२०२१ च्या घटनेने त्या स्वत: तणावात होत्या. याचबरोबर उपरोक्त सर्व नमूद परिस्थिती विचारात घेता इतर कामकाजात व्यस्त असल्याने तसेच संबंधित सहायक आयुक्त यांची बदली त्यादरम्यान झाल्याने व सदर नस्तीबाबतची अंतिम कार्यवाही समाप्त होत असल्याने त्यांनी स्वत: या नस्तीची नंतर विचारणा केली नसल्याची शक्यता आहे. तत्कालीन परिस्थितीत विभागाने सदर नस्ती जर आढळ होत नसेल तर त्याबाबत त्याचवेळी तपासणी करणे आवश्यक होते.

आपल्या लेखी म्हणण्यासोबत तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी कृष्णदेव वाघमळे, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी उपलब्ध छायांकित प्रती सादर केल्या आहेत. तसेच त्या विषयाच्या अनुषंगाने अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाच्या कामकाजाबाबत सविस्तर अहवालसुध्दा उपायुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सादर करणार आहेत. सदर प्रकरणी नस्ती आढळ होत नसल्याचे दिसून येत असले तरी यासाठी त्या जबाबदार नसल्याची त्यांची धारणा आहे.

तत्कालीन उपायुक्त श्रीमती. अश्विनी कृष्णदेव वाघमळे,अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांचे हे लेखी म्हणणे लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणी विद्यमान उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी त्यांचे अभिप्राय आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ६ जानेवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

संगणक -10

**विद्यमान उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग,**
**ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,**
**चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**

**अपिल क्रमांक : के.आर-३७४०/२०२३**
**अपिलार्थी, श्री.राहूल कारभारी पिंगळे,**
**सुनावणी दिनांक १२.२.२०२६ (In continuation of order dt.६.१.२०२६)**
**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दयाराम मोजू पाडवी, कार्यालयीन उप अधिक्षक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.सोपान भाईक, सहा. आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी श्री. उमेश बिरारी, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मु), ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी दि.१२.२.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असे कळविले आहे की, "सदर पत्राच्या अनुषंगाने सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. आयोजित केली आहे. मी श्री उमेश बिरारी, उपायुक्त, (अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मु), सदर सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नाही. कारण की, महानगरपालिका अर्थसंकल्पीय बैठक आयोजित केली असल्याकारणाने सुनावणीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही.

तथापि, या प्रकरणी श्री. उमेश बिरारी, उपायुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मु), ठाणे महानगरपालिका ठाणे यांची उपस्थिती आवश्यक आहे. विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.सोपान भाईक, सहा. आयुक्त यांनी सुनावणी दरम्यान दूरध्वनीवरून श्री. उमेश बिरारी, उपायुक्त यांचेशी संपर्क साधून ते सुनावणीस कशी उपस्थित राहू शकतात अशी विचारणा केली असता ते दि.१८.२.२०२६ रोजी सुनावणीस उपस्थित राहू शकतात असे सांगितले. सबब, प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**
**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. उमेश बिरारी, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपायुक्त,**
**अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मु), ठाणे महानगरपालिका ठाणे,**
**महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,**
**चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**